दैनिक
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
# महावृत्त
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ४ थे अंक २२२ वा रविवार दि.२३ फेब्रुवारी २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# उदय सामंत यांनी घेतली राज ठाकरेंची भेट

मुंबई : प्रतिनिधी शिवसेना नेते आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांनी शनिवारी सकाळी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची त्यांच्या शिवतीर्थ या निवासस्थानी भेट घेतली. मात्र ही भेट केवळ सदिच्छा भेट होती यात कोणतीही राजकीय चर्चा झाली नसल्याचे उदय सामंत भेटीनंतर म्हणाले. मनसे आणि शिवसेना युतीबददल बोलणे ही माझ्या कक्षेतील गोष्ट नाही त्याबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेच बोलतील असे त्यांनी स्पष्ट केले. नाशिक,रायगडच्या पालकमंत्रीपदाचा तिढा येत्या दोन-तीन दिवसांत सुटेल असेही ते म्हणाले.



उदय सामंत हे सकाळी राज ठाकरे यांच्या निवासस्थानी पोहोचले. दोघांमध्ये सुमारे तासभर चर्चा झाली. यामुळे विविध चर्चांना उधाण आले. गेल्या काही दिवसांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापासून भाजप-शिवसेनेच्या अनेक नेत्यांनी राज ठाकरे यांची भेट घेतली आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मनसेला सोबत घेण्याचा महायुतीचा प्रयत्न आहे. या भेटी त्याचाच एक भाग असल्याचे मानण्यात येत आहे. मात्र आमच्यात कोणतीही राजकीय चर्चा झाली नसल्याचे सांगून उदय सामंत म्हणाले, विश्व मराठी साहित्य संमेलनाला राज ठाकरे उपस्थित होते त्यांचे आभार मानायसाठी ही भेट होती.

मराठी भाषेसंदर्भात, विश्व मराठी संमेलनबाबत, दिल्लीत मराठी साहित्य संमेलन सुरू आहे त्याबाबत आम्ही गप्पा मारल्या. राजकीय कोणतीही चर्चा नाही. ही अतिशय साधी भेट होती. राज ठाकरेंबरोबर चर्चा केल्यानंतर अनेक गोष्टी कळत असतात. राजकारणा पलिकडे जाउन गप्पा मारल्या तरी आपल्या ज्ञानात भर पडते असे सामंत म्हणाले.

पालकमंत्रीपदाचा वाद सुटेल नाशिक, रायगडच्या पालकमंत्रीपदाचा वाद केंद्रिय गृहमंत्री अमित शहा यांच्यापर्यंत गेला आहे का असा प्रश्न विचारला असता अमित शहा आणि एकनाथ शिंदे यांच्यातील बैठक ही प्रशासकीय कामांसंदर्भात आहे. महाराष्ट्रातील विकासकामे, २० लाख लोकांना घरेवाटप यांच्याबाबत त्यांची भेट आहे. पालकमंत्रीपदाचा तिढा हा येत्या दोन ते तीन दिवसांत सुटेल असे उदय सामंत म्हणाले. शिवसेना-मनसे युती हा विषय माझ्याकक्षेबाहेरचा आहे त्याबाबत एकनाथ शिंदेच बोलू शकतात असेही ते म्हणाले. रविंद्र धंगेकर यांनी खांद्यावर भगवे उपरणे घातले आहे, भविष्यात त्यावर जर आमचा धनुष्यबाण दिसला तर आनंदच वाटेल असे सूचक वक्तव्यही उदय सामंत यांनी केले.

## सुधारित संच मान्यतेमुळे हजारो शिक्षक अतिरिक्त; ६वी ते ८वीचे वर्ग विनाशिक्षकी

बारामती : प्रतिनिधी राज्य शासनाने १५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयानुसार यावर्षीच्या सुधारित संचमान्यतेमुळे राज्यभरात हजारो शिक्षक अतिरिक्त ठरण्याची भीती निर्माण झाली आहे. राज्य प्राथमिक शिक्षक संघाने या संच मान्यतेस विरोध केला असून संच मान्यता जुन्या निकषानुसार करण्याची मागणी केलेली आहे.



या धोरणानुसार संच मान्यता शाळा लॉगिनसाठी उपलब्ध झालेल्या आहेत. या संचमान्यतेमुळे लहान शाळांमध्ये तिस-या शिक्षकाच्या मंजुरीसाठी पूर्वीची ६१ पटाची अट ७६ पर्यंत वाढवलेली आहे. त्यामुळे लहान शाळांना तिसरा शिक्षक नव्याने मंजूर होण्याचा मार्ग जवळ जवळ बंद झालेला आहे. ६ वी ते ८ वी या वर्गासाठी २० पेक्षा कमी विद्यार्थी संख्येच्या शाळांना '०' शिक्षक मंजूर झाला आहे. यामुळे या वर्गातील मुलांना अन्य गावांत शाळा शोधावी लागणार आहे.

या वर्षीची संचमान्यता प्रत्यक्ष विद्यार्थी संख्येऐवजी आधार व्हॅलिड संख्येवर केली असल्याने अनेक शाळांमध्ये विद्यार्थी संख्या पुरेशी असूनही शिक्षक अतिरिक्त ठरले आहेत. संचमान्यतेतील भाषावार रचनेमुळे बहुतांश समाजशास्त्र पदवीधर शिक्षकांना जिल्हाभरात रिक्त जागा नसल्याचे चित्र आहे. २१० पेक्षा जास्त पटसंख्येच्या शाळांना पुढील प्रत्येक शिक्षकांसाठी ३० ऐवजी ४० विद्यार्थी संख्येची अट घातलेली आहे.

राज्यभरातील शिक्षकांमध्ये या संचमान्यतेच्या विरोधात प्रचंड संताप व्यक्त होत असून संच मान्यतेच्या शासन निर्णयाला शिक्षक संघाचा कडाडून विरोध आहे.

## ८ लाख ५ हजार /- रुपये रकमेचा अपहार केल्या प्रकरणत सायन्ना बलूरकर निलंबीत

किनवट: शेख शौकत :-तालुक्यातील घोटी ग्रामपंचायत येथील मानव कार्यक्रमांतर्गत विकास उचल केलेल्या ८ लाख ५ हजार /- रुपये रकमेचा अपहार केल्या प्रकरणी घोटी ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी सायन्ना बलूरकर यांना नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करणवाल यांनी तडकाफडकी निलंबीत केल्याचे १८ फेब्रुवारी रोजीच्या पत्रात नमूद केले आहे. घोटी ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच बालाजी पावडे यांनी हे प्रकरण लावून धरल्यामुळे शेवटी ही कार्यवाही झाली. सदर प्रकरणात घोटी ग्रामपंचायतीच्या इतरांचेही हात ओले झाल्याचे सकृतदर्शनी स्पष्ट झाल्याने त्यांच्या पदांवरही गंडांतर येण्याची शक्यता व्यक्तविली जात आहे. घोटी ग्रामपंचायतीत विविध विकास योजनेत कांही पदाधिकारी आणि ग्रामपंचायत अधिकारी सायन्ना बलूरकर या कम्पूने अपहार केल्याची तक्रार माजी उपसरपंच बालाजी पावडे यांनी केली होती. त्यावरुन चौकशी करण्यात आली. ८ लाख ५ हजार /- रुपयांचा अपहार केल्याचा मुद्दा स्पष्ट झाल्याने सम प्रमाणात त्यांच्याकडून रक्कम वसूल करणारा घोटी ग्रामपंचायतीच्या इतरांच्याही पदावर गंडांतर येण्याची शक्यता अहवाल किनवटच्या गटविकास अधिकार्यांनी जिल्हा प्रशासनाकडे वस्तुनिष्ठ अहवाल पाठवल्यामुळे सदरची कार्यावाही करण्यात आल्याचे निलंबन आदेशात अंकीत केलेले आहे. सेवा शिस्त भंग केल्यामुळे ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी निलंबीत झालेत. यापुढे त्या वादग्रस्त पदाधिकार्यांना पदाला मुकावे लागण्याची शक्यता नाकारता येणार नसल्याचे सांगण्यात आले. निलंबीत बलूरकरांना सायन्ना भोकर हे मुख्यालय दिलेले असून संबंधितांच्या परवानगीशिवाय मुख्यालय सोडता येणार नसल्याचेही आदेशीत केले आहे. भ्रष्टाचार रकम ही भ्रष्टाचारात लिप्त असलेल्या सर्वांनीच समभागाने शासनाला परत करायची आहे. गटविकास गर्दा अधिकार्यांनी केलेल्या शिफारसीचा हा दणका आहे. पंचियत समितीत संगणक ऑपरेटर विरुद्ध बलूरकरांनी परस्पर रक्कम हडपल्याची जिल्हा प्रशासनाकडे तक्रारी केली होती. त्यात काय निष्पन्न झाले ? ते अद्याप स्पष्ट झालेले नाही. केवळ मानव विकास कार्यक्रमांतर्गतच्या विकास रक्कमेतील भ्रष्टाचारावरुन ही कार्यवाही केली आहे.

## बीडचे खा.बजरंग सोनवणेंची परदेशात क्रेझ; शिवजयंतीनिमीत्त आले अबुधाबीतून निमंत्रण २३ फेब्रुवारी मोठ्या थाटात शिवजन्मोत्सव होणार साजरा

केज/प्रतिनिधी महाराष्ट्रासह देशभरात आणि आता जगभरात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी होत आहे. यावर्षी अरब देशातील अबुधाबीमध्ये दि.२३ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आलेले असून या कार्यक्रमाला प्रमूख पाहूणे म्हणून बीडचे खा.बजरंग सोनवणे यांना निमंत्रीत करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती जगभरातील विविध देशात साजरी केली जात आहे. महाराष्ट्र आणि हिंदूस्थानातील नागरिक परदेशात आता शिवजयंती साजरी करू लागले आहे. अरब देशातील अबुधाबी येथे मागील सात वर्षांपासून उमेश नळगे पाटील, प्रदिप आघाव हे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे आयोजन करत आहेत. यावर्षीही जयंती उत्सव मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात येत आहे. दरवर्षी वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवरांना या जयंती उत्सवाचे निमंत्रण दिले जात असते. यावर्षी बीड जिल्ह्यातील जनतेने मोठ्या विश्वासाने निवडून दिलेले खा.बजरंग सोनवणे यांना प्रमुख म्हणून निमंत्रीत केले आहे.



त्यांच्यसोबत मोलीजीराजे शाहू छत्रपती, मंत्री आयुष स्वतंत्र प्रभार आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री भारत सरकार-ना.प्रतापराव जाधव यांनाही निमंत्रीत करण्यात आलेले आहे. खा.बजरंग सोनवणे यांनी लोकसभा निवडणूकीत विजयी झाल्यानंतर तातडीने बीड-अहिल्यानगर रेल्वेप्रश्नी लक्ष घातलेले आहे. या शिवाय मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणी सर्वप्रथम आवाज उठविला होता. अगदी संसदेत सुध्दा त्यांनी हा विषय पोटतिडकीने आणि माणूसकीच्या नात्याने मांडून महाराष्ट्रासह देशभरातील नागरिकांचे लक्ष वेधून घेतले होते. याच कारणाने महाराष्ट्रासह परदेशातील भारतीय नागरिकांमध्ये खा.बजरंग सोनवणे यांची क्रेझ निर्माण झाली आहे. दि.२३ फेब्रुवारी रोजी अबुधाबी येथे होत असलेल्या शिवजयंती कार्यक्रमास ते उपस्थित राहून भारतीय नागरिक आणि शिवप्रेमींशी ते संवाद साधणार आहेत. बीडचे खा.बजरंग सोनवणे हे अबुधाबीला जयंतीनिमीत्त जात असल्याने ही जिल्ह्यासाठी गौरवाची बाब आहे.

# कर्नाटकच्या बसवर भगवा फडकवला

कोल्हापूर : प्रतिनिधी एकीकडे महाराष्ट्र एकीकरण समितीने सांगलीतून महाराष्ट्र-कर्नाटक सीमावादावरून आंदोलन सुरू केले आहे. तर दुसरीकडे आता कन्नडीगांचा उन्माद सुरू झाला आहे. कन्नडीगांनी महाराष्ट्राची आणि मराठी माणसाची छेड काढली आहे. कर्नाटकमधील चित्रदुर्गजवळ महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसचालकाच्या तोंडाला काळे फासत बसचीही तोडफोड करण्यात आली आहे. यामुळे आता सीमावर्ती भागात याचे तीव्र पडसाद उमटायला सुरुवात झाली असून कोल्हापूर शहरात याचा शिवसेना ठाकरे गटाने निषेध केला आहे. कर्नाटकमधील चित्रदुर्गजवळ महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची बस कन्नडीगांनी फोडली. तसेच चालकाला कर्नाटकात येताय तर कन्नडच बोलायचं असे म्हणत त्याच्या तोंडाला काळे फासले. यामुळे आता संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणावरून कोल्हापुरात उद्धव बाळासाहेब ठाकरेंची शिवसेना आक्रमक झाली आहे.



शुक्रवारी (ता. २१) कर्नाटकातील चित्रदुर्ग येथे कन्नड संघटनांनी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसला काळे फासून ड्रायव्हरला देखील मारहाण केली. यामध्ये कन्नड रक्षण वेदिका या संघटनेच्या कार्यकर्त्यांचा हात आहे.

याविरोधात ठाकरेंच्या शिवसेनेकडून डरकाळी फोडण्यात आली असून आज शनिवार (ता.२२) झालेल्या घटनेचा निषेध नोंदवण्यात आला. शिवसेना ठाकरे गटाचे सहसंपर्क प्रमुख विजय देवणे यांच्या नेतृत्वाखाली कोल्हापूरच्या मध्यवर्ती बसस्थानकाबाहेर आंदोलन करण्यात आले. यावेळी कन्नड संघटनांनी केलेल्या या कृत्याच्या निषेधार्थ जोरदार घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला. विशेष म्हणजे कोल्हापूरच्या मध्यवर्ती बसस्थानकातून कर्नाटकमध्ये जाणारी वाहतूक यावेळी रोखून धरली. तर आक्रमक झालेल्या शिवसैनिकांनी कर्नाटक सरकारला इशारा देत कर्नाटकच्या बसवर भगवा ध्वज फडकवला. बसचालकाच्या तोंडाला काळे फासले कन्नडीगांचा उन्माद वाढत असून या ना त्या कारणावरून कानडी सतत महाराष्ट्राची आणि मराठी माणसाची छेड काढत असतात. आता बसचालकावर हात टाकत त्याच्या तोंडाला काळे फासले आहे. यामुळे पुन्हा एकदा महाराष्ट्र-कर्नाटक वाद पेटण्याची शक्यता आहे.

# बोधडी खु येथील 'बहीण-भावाची' वैद्यकीयक्षेत्रात गगनभरारी.. अक्षय केंद्रे व रुपाली केंद्रे बनले तज्ञ डॉक्टर..!

किनवट: शेख शौकत :-कुळी कन्या-पुत्र होती सात्विक!तयाचा हरेक वाटे हेवा. या संत वचनाचा प्रत्यय किनवट तालुक्यातील बोधडी (खु)या छोट्याशा गावामध्ये दिसून आला. ग्रामीण,मागास व दुर्गम अशी या गावाची ओळख..ना उच्चशैक्षणिक सुविधा..ना कुटुंबात वैद्यकीय वारसा..तरीसुद्धा शेतकरी कुटुंबातील अक्षय केंद्रे व रूपाली केंद्रे या सख्या बहिणभावाने खडतर आर्थिक परिस्थितीला मात देऊन वैद्यकीय क्षेत्रात गगन भरारी घेतली आहे. घरबसल्या ऑनलाईन क्लासेसद्वारे अहोरात्र अभ्यास करून भावाने एमबीबीएस एमडी तर बहिणीने एमबीबीस एम.एस. ही पदवी प्राप्त केली.अक्षय हा आदिलाबादच्या नामांकित रिम्स हॉस्पिटलमध्ये ऑर्थोपेडिकतज्ञ तर रूपाली ही अहमदनगर येथे स्त्रीरोगतज्ञ म्हणून शासकीय सेवेत रुजू झाले आहेत.या उत्तुंग यशाबद्दल त्यांच्यावर सर्वच स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. किनवट पासून सुमारे १२ किलोमीटर अंतरावर बोधडी खुर्द हे छोटेसे गाव..ग्रामीण, मागास दुर्गम अशी या परिसराची ओळख.. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती जेमतेम.. येथे उच्च शिक्षणाची सोय,ना कुटुंबात वैद्यकीय वारसा, ना शासनाच्या कोणत्या सोयी-सवलती... परिस्थिती खडतर असली तरी सामान्य शेतकरी असलेल्या बाबुराव केंद्रे यांच्या कुटुंबातील अक्षय व रूपाली या सख्या बहिणभावाने दुर्दम्य आशावाद, जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमाच्या जोरावर एमबीबीएस डॉक्टर होण्याचे स्वप्न साकार केल.अक्षयने पुण्याच्या श्रीमती काशीबाई नवले मेडिकल कॉलेजमधून एमबीबीएसचे शिक्षण पूर्ण केले तर रूपालीने जळगाव येथील उल्हास पाटील मेडिकल कॉलेजमधून एमबीबीएसचे शिक्षण पूर्ण केल.आई-वडिलांचे शेतातील काबाडकष्ट हेच एकमेव उत्पन्नाचे आणि उदरनिर्वाहाचे साधन..त्यांच्या कष्टाच्या आणि घामाच्या पैशात दोघांचेही एमबीबीएसपर्यँत शिक्षण पूर्ण झाले मात्र त्यानंतर एम.डी आणि एमएसचे शिक्षण घेण्यासाठी मोठ्या शहरात राहून महागड्या कोचिंग क्लासेसचा खर्च आई-वडिलांच्या आवाक्याबाहेर आहे याची जाणीव होताच अक्षय व रूपालीने ध्येयप्राप्तीसाठी ऑनलाइन क्लासेसचा पर्याय शोधला.कुठेही न जाता घरबसल्या ऑनलाइन क्लासेस करून अक्षय एमबीबीएस एमडी आर्थोपेडिक तर रूपाली ने एमबीबीएस एम एस`लसू स्त्रीरोग तज्ञ् म्हणून यश संपादन केले. सन.२०२३ पासून अक्षय केंद्रे हा आदिलाबादच्या नामांकित रीम्स हॉस्पिटलमध्ये सेवा बजावत आहेत तर बहीण रूपाली केंद्रे ही १८ फेब्रुवारी २०२५ रोजीपासून अहमदनगर जिल्ह्यातील विठ्ठलराव विखे पाटील हॉस्पिटलमध्ये स्त्रीरोगतज्ञ म्हणुन रुजू झाली आहे. श्रीमंती आणि महागड्या खाजगी क्लासेसमधूनच तज्ञ घडतात हा प्रघात बोधडीसारख्या छोट्याशा खेड्यात राहणाऱ्या बहीणभावाने ऑनलाईन क्लासेसच्या माध्यमातून मोडीत काढला असून वैद्यकीय क्षेत्रातील उत्तुंग भरारीबद्दल डॉ.अक्षय केंद्रे व डॉ रुपाली केंद्रे यांच्यावर सर्वस्तरातून अभिनंदन व कौतुकाचा वर्षाव होत आहे.

> पुरुषप्रधान संस्कृतीत महिलांना नेहमीच दुय्यम स्थान राहिले आहे. बाहेर राहून शिक्षण घेताना आई-वडिलांचा मुलीवर असलेला विश्वास आणि पाठबळ हे महत्त्वपूर्ण असते. शेतात काबाडकष्ट करून माझ्या आई-वडिलांनी माझ्यावर दृढविश्वास ठेवला त्यामुळे माझ्या यशाचे पूर्ण श्रेय माझ्या आई वडिलाला देते. यात शिक्षकांचे मार्गदर्शनही मोलाचं ठरलं. या निमित्ताने एक डॉक्टर म्हणून उपेक्षित, गोरगरीब लोकांची आरोग्यसेवा करण्याची संधी मिळाली.
> डॉ.रुपाली केंद्रे रा.बोधडी खु. ता किनवट.



दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# दिल्लीत मराठीची पताका

सार्या ब्रह्मांडाचा आवाज शांत होऊ शकतो; पण लेखक शांत होऊ शकत नाही. किंबहुना, तो कधीच शांत राहू शकत नाही. तो आपला व्यक्त होतच राहतो, असे उद्गार ख्यातनाम गीतकार आणि लेखक गुलजार यांनी नऊ वर्षांपूर्वी पिंपरी–चिंचवड येथे भरलेल्या ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन करताना काढले होते. आता सुमारे सात दशकांनी राजधानी दिल्लीमध्ये ९८ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाची नांदी झाली. या संमेलनाचे वैशिष्ट्य हे की, उद्घाटक म्हणून मराठीचे सख्खे शेजारी आणि देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी मिळाले. देशाच्या आर्थिक राजधानीच्या राज्यातून देशाच्या राजधानीत आलेल्या सर्व मराठी सारस्वतांना नमस्कार करत, संमेलनाच्या औचित्याची आठवण करून देत त्यांनी उपस्थितांची मने जिंकली अन् आपल्या आशय आणि अर्थपूर्ण भाषणातून साहित्य रसिकांवर गारुड केले. 'हे मराठी संमेलन अशावेळी होत आहे, जेव्हा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाला ३५० वर्षे पूर्ण झाली, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जन्मजयंतीला ३०० वर्षे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रयत्नाने बनलेल्या आपल्या संविधानानेदेखील ७५ वर्षे पूर्ण केली' हा उल्लेख करत त्यांनी विषयाला हात घातला. खरे औचित्य होते, ते मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याचे. 'मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी कोट्यवधी मराठी भाषिक अनेक दशकांपासून वाट पाहत होते. हे काम पूर्ण करण्याची संधी मला मिळाली. मी याला आपल्या जीवनातील मोठे सौभाग्य मानतो' हे सांगताना अनेक वर्षांपासून प्रलंबित विषय आपल्या कारकिर्दीत मार्गी लागल्याचा उल्लेख ते आवर्जून करतात. मराठी साहित्याची आणि ते सुरू करणार्या साहित्यिकांची परंपरा सांगत त्यांनी साहित्याच्या सर्व प्रमुख प्रवाहांचा धांडोळा घेत, आपल्या उद्घाटनपर भाषणातून मराठीबद्दलची आस्था असणार्या एका नेत्यातील संवेदनशीलतेचे दर्शन घडवले. मुंबई महाराष्ट्राचीच नाही, तर संपूर्ण देशाची आर्थिक राजधानी असल्याचा त्यांनी केलेला उल्लेखही मराठीजनांना सुखावून गेला. स्वागताध्यक्ष शरद पवार यांनीही पंतप्रधानांनी संमलनाचे आमंत्रण स्वीकारल्याचा उल्लेख आपल्या स्वागतपर भाषणात केला. १९५४ मध्ये दिल्लीत झालेल्या साहित्य संमेलनात पंतप्रधान जवाहरलाल नेहरू प्रमुख पाहुणे होते आणि त्या संमेलनाचे स्वागताध्यक्ष प्रख्यात नेते काकासाहेब गाडगीळ होते. त्याचे अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी होते. स्वागताध्यक्ष पवार यांनी संमेलनाची पार्श्वभूमी मांडत, या साहित्यपंढरीचा मी वारकरी असल्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. नामदेव महाराज यांच्या पंजाबमधील घुमान या कर्मभूमीत २०१५ मध्ये साहित्य संमेलन झाले. मराठी आणि पंजाबी भाषेच्या ऋणानुबंधालाही यावेळी उजाळा मिळाला. ते संमेलन 'सरहद' या संजय नहार यांच्या संस्थेनेच आयोजित केले होते. तसेच, आताही दिल्लीतील मराठी साहित्य संमेलन या संस्थेमार्फतच होत आहे. १९५४ मध्ये दिल्ली येथे संमेलन झाले, तेव्हा संयुक्त महाराष्ट्र झाला नव्हता. आता संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न साकार होऊन ६५ वर्षे झाली असून, भारत सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा घोषित केला असल्याने, संमेलनाचे महत्त्व वाढले. बाजीराव पेशवे झाले, त्यावेळी मराठी राज्याला चहू बाजूंनी शत्रूंनी वेढलेले होते. परंतु, माळव्यात इ. स. १७०० पासून मराठी फौजा लागल्या होत्या आणि त्याचा फायदा घेऊन, दिल्ली दरबारात वर्चस्व स्थापन करण्याची गरज होती. बाजीरावांनी थेट दिल्लीवर हल्ला करण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या व्यापक मोहिमांमुळे छत्रपती शाहू महाराजांच्या काळात मराठ्यांनी संपूर्ण भारताच्या राजकारणावर आपला दबदबा निर्माण केला होता. बाजीरावांच्या काळात मराठा साम–ाज्य तुंगभद्रेच्या दक्षिणेला असलेल्या प्रदेशापासून ते यमुनेपर्यंत पसरले होते. गुजरातपासून छत्तीसगडपर्यंत मराठ्यांचीच सत्ता होती.

दिल्लीत ज्या तालकटोरा स्टेडियममध्ये हे मराठी साहित्य संमेलन भरवण्यात आले आहे, बाजीराव पेशव्यांच्या दिल्ली मोहिमेशी त्या तालकटोराचा संबंध आला होता आणि म्हणूनच आज तेथे साहित्य संमेलन होत आहे, हे अर्थपूर्ण म्हणावे लागेल. इतर भाषांतून मराठीत होणार्या अनुवादांची संख्या प्रचंड असून, मराठीतील पुस्तकांचा मात्र इतर भाषांत अनुवाद होण्याचे प्रमाण तेवढे नाही. वि. स. खांडेकर, विजय तेंडुलकर, जयंत नारळीकर, श्री. ना. पेंडसे, विश्राम बेडेकर अशा मोजक्याच लेखकांचे मराठी लेखन इंग्रजीत गेले. बेडेकर यांच्या 'रणांगण'चा जर्मनीत अनुवाद झाला. ज्ञानेश्वर–तुकाराम यांचे साहित्य इतर भाषांत गेले. शांता गोखले यांनी लक्ष्मीबाई टिळक यांच्या 'स्मृतिचित्रे'चे इंग्रजीत भाषांतर केले असून, त्याला साहित्य अकादमी पारितोषिक मिळाले होते. प्रख्यात इंग्रजी लेखक जेरी पिंटो यांच्या एका कादंबरीच्या मराठीत केलेल्या भाषांतराला बाळशास्त्री जांभेकर पुरस्कार प्राप्त झाला. आज मराठी व इंग्रजीत अशा दोन्ही भाषांत लिहिणार्या मराठी लेखकांची संख्या वाढली पाहिजे. त्याचप्रमाणे अवघ्या भारताचा पट आणि विश्वाचा पट आपल्या साहित्यातून मांडणार्या लेखकांची संख्याही वाढायला हवी. मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटन सोहळ्यात 'मराठ्याविना राष्ट्रगाडा न चाले' या सेनापती बापटांच्या पंक्तीचा उल्लेख झाला. एकेकाळी 'लेखण्या मोडा आणि बंदुका हाती घ्या,' असे आवाहन स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी केले होते. 'आज स्वतंत्र भारताचा अमृतकाल सुरू झाला असून, बंदुका मोडा आणि लेखण्या हाती घ्या,' असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जम्मू–काश्मीरमध्ये केले होते, याचा उल्लेख संजय नहार यांनी संमेलनात सार्थपणे केला. साहित्य संमेलनातील व्यासपीठांवर परस्परविरोधी विचारांचे लोकही एकत्र येतात आणि तसे ते नवी दिल्लीत आले, ते बरेच झाले. संमेलानध्यक्ष तारा भवाळकर यांचे लोकसाहित्यावरील आणि एकूणच महाराष्ट्रातील परंपरांविषयीचे प्रागतिक विचार संपूर्ण महाराष्ट्राला ज्ञात आहेत. संमेलनाध्यक्षपदी एका महिलेचा योग्य सन्मान झाला. राजकारणी व साहित्यिक यांचा निमित्ता–निमित्ताने सहवास घडण्यास काहीच हरकत नाही.

# यावर्षीचा 'कोरडवाहू' अर्थसंकल्प

कृषी क्षेत्राला विकासाचे पहिले इंजिन म्हणत, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी १ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रधानमंत्री धन धान्य योजना आणि इतर योजनांची घोषणा केली. कमी उत्पादन आहे अश्या १०० जिल्ह्यांतील १.७ कोटी शेतकऱ्यांना या योजनेचा फायदा होईल असे म्हटले गेले. केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान म्हणाले की अर्थसंकल्पामुळे शेती क्षेत्राच्या सर्वांगीण विकासला मदत होईल. मात्र प्रत्यक्षात या विकासाच्या इंजिनाला निधीची उर्जा मिळालीच नाही. शेतीसाठी लागणाऱ्या वस्तूंच्या व खतांच्या किमतींमध्ये आणखी वाढ होण्याची शक्यता या अर्थसंकल्पातून दिसते आहे. अर्थसंकल्पातील शेतकरी हिताच्या महत्वाच्या १० योजना शेतकऱ्यांसाठी फायद्याच्या ठरतात की नेहमीप्रमाणे पालापाचोळ्यासारख्या हवेत उडून जातात हे पाहण्यासारखे आहे.

वाढत्या महागाईबरोबर शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही गगनाला भिडत आहे, शेतकऱ्यांचे उत्पन्न मातीमोल ठरत आहे. त्यांच्या



मालाला चांगला भाव मिळत नाही. निर्यात धोरणाचा अभाव दिसून येत आहे कारण ज्या काळात शेतकऱ्याचा माल बाजारात आणला जातो त्या काळात सरकार विदेशी मालाची आयात करून, स्वदेशी मालाची निर्यात बंदी करते. या असल्या धोरणामुळे शेतकऱ्यांवर आपला माल रस्त्यावर फेकून देण्याची वेळ येते कारण तो माल बाजारात नेला तर वाहतूक खर्च आणि अडतीचा खर्च शेतकऱ्याला परवडत नाही. मोठा गाजावाजा करत ज्या १० योजना जाहीर केल्या, त्यामधील कापूस उत्पादकता मिशन पाच वर्षांसाठी राबवण्यात येणार आहे पण या योजनेसाठी केवळ ५०० कोटींचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. या मिशनमधून कापूस उत्पादक शेतकऱ्यांना अद्ययावत तंत्रज्ञान पुरवले जाणर आहे आणि यातून उत्पादकता वाढीवर लक्ष केंद्रित केले जाणार असल्याचे म्हटले गेले आहे. शेतकऱ्यांना लांब धाग्याच्या कापसाचे वाण या योजनेतून पुरवले जाणार आहे. कापूस उद्योगासाठी 'फाइव्ह एफ' धोरण राबवले जाणार आहे. यातून कापड उद्योगाला गुणवत्तापूर्ण कापसाचा सुरळीत पुरवठा करण्यावर जोर दिला जाणार आहे. या योजनेंतर्गत एवढे सगळे उदिष्ट समोर ठेवले आहे, पण निधी मात्र अत्यंत तोकडा दिला गेला आहे. आणि या ५०० कोटी रुपयामध्ये हे मिशन पूर्ण देशभरामध्ये कसे राबवले जाईल हे येणाऱ्या काळात कळेलच.

कडधान्याची आयात कमी करण्यासाठी व आत्मनिर्भर होण्यासाठी सहा वर्षाची योजना जाहीर केली आहे. यात तूर, उडीद, मसूर उत्पदान वाढवण्याची घोषणा आहे. पुढील चार वर्षे शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या तूर, उडीद आणि मसूरची पूर्ण खरेदी नाफेड आणि एनसीसीएफच्या माध्यमातून केली जाणार आहे. परंतु या योजनेसाठी केवळ एक हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तर दुसरीकडे तूर, हरभरा आणि वाटाणा अशा कडधान्यांनी आयातीचे नवे विक्रम केले आहेत. मग अशा प्रकारे आयात होत राहिली आणि शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव नाही मिळाला तर मग आपण कडधान्य उत्पादनात कसे बरे आत्मनिर्भर होऊ शकतो? मागास १०० जिल्ह्यांसाठी पंतप्रधान धनधान्य योजना जाहीर केली आहे. या योजनेसाठी केवळ १०० कोटींचा निधी जाहीर केला आहे, म्हणजेच एका जिल्ह्यासाठी एक कोटी रुपये मिळण्याची शक्यता आहे. या योजनेचा एक कोटी ७० लाख शेतकऱ्यांना लाभ देण्यात येईल असे उदिष्ट ठेवले गेले आहे. या योजनेसाठी निवडलेल्या जिल्ह्यांमध्ये उत्पादकता वाढवणे, विविध पिकांची लागवड करणे, पीक पद्धतींमध्ये बदल करणे, सिंचन सुविधेत वाढ करणे, दीर्घ व अल्प मुदतीचे कर्ज उपलब्ध करून देणे या सगळ्या उद्दिष्टांची बोळवण फक्त १०० कोटींवर करण्यात आली आहे.

राष्ट्रीय तेल मिशन योजनेला यावर्षीच्या अर्थसंकल्पातून बगल दिल्याचे दिसून येत आहे. निधीच नसेल तर आपण राष्ट्रीय तेलबिया मिशन पूर्ण करून खाद्यतेल उत्पादनात कधी आत्मनिर्भर होणार आणि खाद्यतेल आयात कशी आणि कधी कमी करणार ?

रासायनिक खतांच्या अनुदानामध्ये २६,५००.८५ कोटी रुपयांची कपात करण्यात आली आहे. मागील आर्थिक वर्षात १,८३,००३.२९ कोटी च्या सुधारित अंदाजावरून या वर्षी १,५६,५०२.४४ कोटी रुपयांच्या अनुदानाची तरतूद यावर्षी करण्यात आली आहे. म्हणजे २६,५००,८५ कोटी रासायनिक खतांच्या अनुदानात कपात करण्यात आली आहे. यामुळे खत अनुदानात घट होऊन रासायनिक खतांच्या किमती आणखी वाढण्याची चिन्हे स्पष्ट होताना दिसत आहेत.

या व्यतिरिक्त शेतकऱ्यांना निवडणूक काळात पीएम किसान सन्मान निधीमध्ये वाढ करण्याची आशा दाखवण्यात आली होती. त्यामुळे शेतकऱ्यांना सरकारकडून ती अपेक्षा होती, त्यांना दुसरी अपेक्षा होती ती संपूर्ण कर्जमाफीची. ती या अर्थसंकल्पातून पूर्ण झालेली दिसत नाही. तिसरी अपेक्षा होती ती हमीभावाबद्दल ठोस उपाययोजना करण्याची आणि चौथी सिंचन सुविधेत सुधारणा करून भरीव निधीची.

२०२५ च्या अर्थसंकल्पात कृषी क्षेत्रातील महत्वाच्या योजनांचा निधी कमी करण्यात आलेला दिसून येत आहे. हा अर्थसंकल्प शेतकऱ्यांसाठी कोरडवाहू अर्थसंकल्प आहे, ज्यातून शेतकऱ्यांना केवळ निराशाच हाती आलेली दिसून येते.

# पत्नीच्या निर्वाहनिधीच्या कायद्यात बदल हवा?

ट्रम्प सत्तेवर आल्यापासून सरकारी खर्चात कपात करण्याचा प्रयत्न करत आहेत. याची जबाबदारी त्यांनी एलॉन मस्क यांच्याकडे दिली आहे. मस्क हे सरकारी कार्यक्षमता विभागाचे (डॉज) प्रमुख आहेत. ते केवळ कर्मचार्यांना काढून टाकत नाहीत, तर अनावश्यक खर्चाला कात्री लावत आहेत. यामध्ये 'युनायटेड स्टेटस् एजन्सी फॉर इंटरनॅशनल डेव्हलपमेंट' (यूएसएआयडी) ला मस्क यांनी प्रथम लक्ष्य केले आहे. यादरम्यान 'यूएसएआयडी'ने भारतातील मतदारांची संख्या वाढवण्यासाठी २१ दशलक्ष डॉलर दिल्याचे बोलले जात आहे.

ट्रम्प यांनी 'यूएसएआयडी'च्या निधीला कात्री लावण्याचा निर्णय घेतला असून, अमेरिकन करदात्यांचा पैसा परकीयांवर का खर्च करावा, असा सवाल उपस्थित केला आहे. त्यांच्या मते, खर्च करायचाच असेल तर तो अमेरिकेतील आपल्याच लोकांवर करावा. 'यूएसएआयडी' करदात्यांच्या पैशांचा योग्य वापर करत नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. अर्थात, या खर्चाला कात्री लावण्याचा निर्णय घेतल्यानंतर मानवतावादी मदत सुरू ठेवण्याचे आदेश त्यांनी दिले आहेत. ट्रम्प आणि मस्क यांच्या मते, 'यूएसएआयडी'च्या खर्चाबाबत कोणतीही स्पष्ट माहिती नाही. हा पैसा कोणाला दिला? आणि कुठे खर्च झाला? याबाबत स्पष्टता नाही. कारण, ही एजन्सी अन्य संस्थांना निधी पुरवते. या संस्था पुढे काय करतात, याची माहिती नाही. थोडक्यात, ही संस्था अनावश्यक कामांमध्ये गुंतली असून, तिचा मूळ उद्देश भरकटत चालला असल्याचे ट्रम्प यांचे म्हणणे आहे. 'यूएसएआयडी'कडून उद्योगपती जॉर्ज सोरोसच्या संघटनांना २६ कोटी डॉलर मिळाल्याचा आरोप ट्रम्प यांनी आधी केला होता. सोरोसने या पैशांचा वापर भारत आणि बांगला देशसह अनेक देशांत अस्थिरता निर्माण करण्यासाठी आणि राजकीय क्षेत्रात ढवळाढवळ करण्यासाठी केला, असा दावाही ट्रम्प यांनी केला होता. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी हा मुद्दा उपस्थित करून भारताचे तुकडे करण्यासाठी विविध संस्थांना 'यूएसएआयडी'कडून निधी दिला गेल्याचा दावा केला असून, सोरोसच्या ओपन सोसायटी फाऊंडेशनला भारताचे तुकडे पाडण्यासाठी ५ हजार कोटी रुपये दिले होते की नाही, असा सवाल विरोधी पक्षांना केला आहे. तसेच, याप्रकरणी चौकशी करून दोषी आढळणार्या लोकांना तुरुंगात टाकावे, अशी मागणी दुबे यांनी सरकारकडे केली. यावेळी सोरोस याच्याशी काँग्रेसचे संबंध असल्याच्या आरोपांचा दुबे यांनी पुनरुच्चार केला. तसेच, संस्थेच्या सांगण्यावरूनच भारतात जातीय जनगणना करण्याचा आग्रह राहुल गांधी यांच्याकडून धरला जात आहे. जातीआधारित जनगणनेमागे जाती–जातींमध्ये भेदभाव निर्माण करून भारतीय समाजात दुही आणि परस्पर अविश्वासाचे वातावरण निर्माण करण्याचाच उद्देश आहे, असेही त्यांनी म्हटले आहे.



दुसरीकडे, काँग्रेस पक्षानेही भारताच्या निवडणूक प्रक्रियेत परकीय हस्तक्षेपाचा निषेध केला आहे. त्यांनी मोदी सरकारला 'यूएसएआयडी'च्या दाव्यांची चौकशी करावी आणि काही गैरकृत्य घडले असेल तर कारवाई करावी, असे आवाहन केले आहे. अर्थात, 'यूएसएआयडी'ने हा पैसा भारतातील मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी वापरला. मात्र, एवढी मोठी रक्कम कोणाला देण्यात आली, हे स्पष्ट झालेले नाही? मात्र भारताच्या स्वतंत्र निवडणूक प्रक्रियेत अमेरिका मनी पॉवरच्या माध्यमातून ढवळाढवळ करत असल्याचे स्पष्ट झाले आहे. या वादाच्या केंद्रस्थानी 'कन्सोर्टियम फॉर इलेक्शन्स अँड पॉलिटिकल प्रोसेस स्ट्रेंथनिंग' हा अमेरिकेतील एक गट आहे. यामध्ये नॅशनल डेमोक्रॅटिक इन्स्टिट्यूट, इंटरनॅशनल रिपब्लिकन इन्स्टिट्यूट आणि इंटरनॅशनल फाऊंडेशन फॉर इलेक्टोरल सिस्टीम्स यांचा समावेश आहे. या संघटना जगभरातील लोकशाही संस्थांना पाठिंबा देण्यासाठी आंतरराष्ट्रीय मदतीसाठी 'यूएसएआयडी'शी सहकार्य करतात. 'यूएसएआयडी' अनेक दशकांपासून भारतात सक्रिय आहे. २००१ पासून २.८६ अब्ज डॉलरचा निधी प्रदान करत आहे, ज्यामध्ये गेल्या चार वर्षांत केवळ ६५० दशलक्ष डॉलरचा समावेश आहे. नव्या जगामध्ये लोकशाही ही सर्वोत्तम शासन प्रणाली आहे. असे असले तरी अमेरिकेसारख्या बलशाली सत्तांकडून विविध देशांमध्ये मर्जीतील सरकारे प्रस्थापित करण्यासाठी विविध तंत्रांचा वापर केला जातो आणि या तंत्रांमुळे जगातील लोकशाही अस्थिर होत चालली आहे. हा सर्व प्रकार चिंताजनक आणि काळजी वाढवणारा आहे. यावर कसा लगाम घालावयाचा, हा मोठा प्रश्न होता. 'फॉरेन कॉन्ट्रिब्यूशन (रेग्युलेशन) अॅक्ट'अंतर्गत, कोणत्याही भारतीय राजकीय पक्षाला विदेशी स्रोतांकडून निधी स्वीकारण्यास मनाई आहे. तथापि, काही प्रकरणांमध्ये, विदेशी संस्थांनी अप्रत्यक्ष मार्गाने किंवा स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून निधी पुरविल्याचे आरोप झाले आहेत. उदाहरणार्थ, २०१४ च्या निवडणुकांमध्ये, काही एनजीओंवर आरोप झाले होते की, त्यांनी विदेशी निधीचा वापर करून विशिष्ट राजकीय पक्षांविरोधात प्रचार केला. यासंदर्भात, अमेरिकेतील काही संस्थांची नावेही समोर आली होती. तथापि, याबाबतचे आरोप सिद्ध झाले नाहीत. ट्रम्प म्हणाले की, भारतात मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी आपल्याला २१ दशलक्ष डॉलर देण्याची गरजच काय? भारतातील निवडणुकीत जो बायडेन यांना दुसर्या कोणाला तरी निवडून आणायचे होते. आपण भारत सरकारला याबद्दल सांगायला हवे, असे म्हटले आहे. केवळ भारतच नव्हे, तर बांगला देशमध्ये राजकीय स्थैर्य निर्माण करण्याच्या नावाखाली अमेरिकेने निधी पुरवल्याचे आरोप झाले आहेत. विशेषतः, बांगला देशमधील शेख हसीना सरकार हटविण्यामागे अमेरिकेचाच हात होता, असा आरोप केला गेला आहे. आज बांगला देशामध्ये प्रचंड अराजक माजले असून, लोकनियुक्त सरकार नसल्यामुळे या अराजकावर नियंत्रण ठेवणे कठीण होऊन बसले आहे.

# डायबेटीस असल्यास सकाळची सुरुवात ‘बुलेट कॉफी’ने करावी का? काय आहेत फायदे-तोटे? जाणून घ्या तज्ज्ञांकडून

आपल्यातील अनेक जण चहा किंवा काही कॉफीप्रेमीसुद्धा आहेत. कोणाची चहाचे सेवन केल्याशिवाय झोप उडत नाही, तर कोणाला दिवसातून दोन ते तीन वेळा कॉफीचे सेवन केल्याशिवाय जमत नाही. सध्या विविध कॅफेमध्ये कॅपुचिनो, लाटे, गरम कॉफी, कोल्ड कॉफी, फिल्टर कॉफी असे कॉफीचे विविध प्रकार उपलब्ध आहेत. पण, सध्या बुलेट कॉफीसुद्धा बरीच चर्चेत आहे. सेलिब्रिटींमध्ये या कॉफीची बरीच क्रेझ पाहायला मिळते आहे, ज्याला प्री–वर्कआउट ड्रिंक म्हणून अनेकदा ओळखले जाते. तर सकाळी ऊर्जा वाढवणारी ही बुलेट कॉफी मधुमेह (डायबेटीस) असलेल्या लोकांसाठी सुरक्षित आहे का? याबद्दल जाणून घेण्यासाठी दी इंडियन एक्स्प्रेसने तज्ज्ञांशी चर्चा केली आहे आणि ट्रेंडी पेय किंवा कॉफी दिनक्रमात समाविष्ट करण्याआधी डायबेटीस असणाऱ्यांना त्यामुळे कोणते धोके उद्भवू शकतात आणि त्यांनी कोणती खबरदारी घेतली पाहिजे हे समजून घेतले.



कमल मेडिकल केअर फिजिशियन ण्ड एस्थेटिक क्लिनिकचे पीजीपी (डायबेटोलॉजी) सल्लागार फिजिशियन डॉक्टर कमलजीत सिंग कैंथ म्हणाले की, बुलेट कॉफी, ज्याला बटर कॉफीदेखील म्हणतात. हे एक हाय फॅट्स आणि कमी कार्ब असलेले पेय आहे. ही मीठ नसलेले बटर व मीडियम चेन ट्रायग्लिसराइड तेलासह कॉफीचे मिश्रण करून बनवले जाते. केटोजेनिक आहाराचे पालन करणाऱ्या बहुतांशी व्यक्ती या कॉफीचे सेवन करतात. बुलेट कॉफी कार्बोहायड्रेट्सचे प्रमाण कमी ठेवून ऊर्जा वाढवण्याचे काम करते.

डॉक्टर म्हणाले की, मधुमेहाच्या रुग्णांसाठी याची शिफारस करण्यात आलेली नाही. कारण– बुलेट कॉफीमधील हाय फॅट्स कन्टेन्ट रक्तातील साखर स्थिर ठेवण्यास मदत करू शकते; विशेषतः जर तुम्ही कर्बोदकांमधे कमी घेत असाल. पण, बुलेट कॉफीमधील बटरमध्ये सॅच्युरेटेड फॅट्स असतात, ज्यामुळे कोलेस्ट्रॉलची पातळी वाढू शकते, ज्यामुळे चिंता निर्माण होते. विशेषतः जर तुम्हाला आधीच हृदयाशी संबंधित समस्या असतील, तर मधुमेह असणाऱ्यांच्या बाबतीत ही एक सामान्य समस्या आहे. त्यांनी असेही सांगितले की, बुलेट कॉफी मायक्रोव्हस्क्युलर, मॅक्रोव्हस्क्युलर व ब्लॉकेजेसची शक्यता वाढवू शकते.

ल्युसीन रिच बायोचे सह–संस्थापक व संचालक डॉ. देबोज्योती धर यांनी सांगितले की, बुलेट कॉफीमधील मुख्य घटक असलेल्या सॅच्युरेटेड फॅट्सचे जास्त प्रमाणात सेवन करणाऱ्या मधुमेही रुग्णांना धोका निर्माण होऊ शकतो. कारण– त्यामुळे रक्तातील साखरेची पातळी वाढून, हृदय व रक्तवाहिन्यासंबंधीच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो. त्यामुळे अशा ट्रेंडवर दीर्घकालीन विसंबून न राहण्याचा इशारा त्यांनी यावेळी दिला आहे.

बुलेट कॉफी हा संपूर्ण नाश्ता नाही

तसेच तज्ज्ञ म्हणाले की, मधुमेहींसाठी बुलेट कॉफीच्या सेवनाच्या मुख्य तोटा हा वजन वाढणे, अस्वास्थ्यकर कोलेस्ट्रॉलचे प्रमाण वाढणे आणि संतुलित आहाराची जागा घेतल्यास पोषक घटकांची कमतरता यांचा समावेश होतो. त्यांनी असेही म्हटले आहे की, बुलेट कॉफी हा संपूर्ण नाश्ता नाही. त्यामुळे इतर खाद्यपदार्थांसह आहाराचा समतोल न साधल्यास तुम्हाला आवश्यक पोषक घटकांची कमतरता भासू शकते.

जर तुम्हाला डायबेटीस असेल आणि बुलेट कॉफी पिण्याचा तुम्ही विचार करीत असाल, तर डॉक्टर धर यांनी सांगितले की, तुम्ही याबाबत प्रथम तुमच्या डॉक्टर किंवा आहारतज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. तुमच्या रक्तातील साखरेची पातळी तपासा आणि तुम्ही योग्य आहार घेत आहात याची खात्री करून घ्या. सुरुवातीला या कॉफीचे अगदी थोड्या प्रमाणात सेवन करा आणि तुमचे शरीर या सेवनाला कसा प्रतिसाद देते ते बघा.

## ‘कुबूल है’ मालिकेदरम्यान सुरभी चंदना घ्यायची डाएट; काय असतो डाएट अन् याचे फायदे काय आहेत, तज्ज्ञांकडून घ्या जाणून

टीव्ही अभिनेत्री सुरभी चंदना तिच्या उत्तम अभिनयामुळे घराघरात पोहचली. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत तिने तिच्या फिटनेसविषयी सांगितले आहे. ठराविक पदार्थ नाही, पण तिला चांगले जेवण करायला आवडते. सुरभीने सांगितले की, टीव्ही मालिका ‘कुबूल है’ चे शूटिंग करताना तिने जीएम डाएट घेण्याचा प्रयत्न केला होता, ज्याला जनरल मोटर्स आहारसुद्धा म्हणतात. सुरभीने पिंकविलाशी बोलताना सांगितले, मला वाटते की मी कुबूल है (२०१२–१६) या दिवसांमध्ये जीएम डाएट घेण्याचा प्रयत्न केला होता. त्यात एके दिवशी फळे खाणे, दुसऱ्या दिवशी भाज्या खाणे इत्यादी प्रकार असतो. ते कोण करते? मला माफ करा, पण जे लोक फॉलो करतात त्यांना हॅट्स ऑफ. मला वाटते की हे लोक खरोखर वेडे आहेत. त्यानंतर सुरभीने डाएटमध्ये बदल केला. ती सांगते, तुम्ही तेच केले पाहिजे, ज्यामुळे तुम्हाला आनंद होऊ शकतो. मला जे पदार्थ खाताना आनंद मिळतो ते मी खाते. जीएम डाएटविषयी आज आपण जाणून घेऊ या. सात दिवसांचा हा जीएम डाएट लगेच वजन कमी करण्यासाठी फायदेशीर आहे. आहारतज्ज्ञ कनिक्का मल्होत्रा सांगते, हा डाएट एफडीए आणि युएसडीए यांच्या मदतीने तयार केला आहे. आहारामध्ये दररोज विशिष्ट पदार्थांच्या प्रकारांचा समावेश असतो. फळे, भाज्या आणि प्रोटिन यावर लक्ष केंद्रित केल्याने शरीरातील फॅट्स आणि कर्बोदके कमी करण्यास मदत होते. जीएम डाएटचा आरोग्यावर कसा प्रभाव पडतो? जीएम डाएट हा कमी कॅलरीयुक्त असतो. प्रत्येक दिवशी वेगवेगळ्या प्रकाराचे सेवन केले जाते. पहिला दिवस : फक्त फळे (केळी सोडून) दुसरा दिवस : फक्त भाज्या (कच्च्या किंवा शिजवलेल्या) तिसरा दिवस : फळे आणि भाज्या यांचे मिश्रण चौथा दिवस : केळी आणि दूध पाचवा दिवस : टोमॅटो आणि दुबळे मांस (किंवा पर्याय) सहावा



दिवस : भाज्या आणि मांस सातवा दिवस : ब्राऊन राइस, फळांचा रस आणि भाज्या या डाएटसह दररोज ८–१२ ग्लास नियमित पाणी प्यावे. मल्होत्रा सांगतात की, ज्या लोकांनी हा डाएट घेण्याचा प्रयत्न केला आहे त्यांनी आठवड्याभरात आठ किलोपर्यंत वजन कमी केले आहे. प्रामुख्याने कॅलरीचे सेवन कमी केल्यामुळे आणि जास्त पाणी प्यायल्यामुळे हे शक्य आहे. त्या द इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना सांगतात, हा डाएट खूप जास्त फळे आणि भाज्या खाण्यास प्रोत्साहन देतो, ज्यात फायबर, व्हिटॅमिन्स आणि मिनरल्स असतात आणि विशेष म्हणजे कॅलरी कमी असतात. जीएम डाएटमुळे प्रक्रिया केलेले पदार्थ किंवा साखरयुक्त पदार्थ खाणे आपण टाळतो आणि एकूण साखरेचे प्रमाण कमी करण्यास मदत होते. खूप जास्त कॅलरी कमी झाल्यामुळे भूक लागू शकते. अनेक जण हा डाएट दीर्घकाळासाठी करू शकत नाही, असे मल्होत्रा सांगतात.

# तुम्हीही घरात कपडे सुकत घालताय, मग थांबवा ही सवय; होऊ शकतात ‘हे’ आजार

थंडी आणि पावसाळ्यात सर्वांत मोठी समस्या असते ती म्हणजे ओले कपडे सुकवण्याचे. बऱ्याच जणांना रोजचे ओले कपडे घरात सुकवण्याची सवय असते. त्यासाठी घरात एका विशिष्ट ठिकाणी कपडे सुकवण्यासाठी दोऱ्या बांधल्या जातात, हँगर लटकवण्यासाठी किंवा स्टॅण्ड ठेवण्यासाठी जागा असते. पण, कपडे अशा प्रकारे घरात सुकवल्याने तुम्ही आजारी पडू शकता. याचा अर्थ असा की, कपड्यांच्या ओलाव्यामुळे घरातील वातावरणावर परिणाम होतो. त्याचा आपल्या शरीरावरही विपरीत परिणाम होत असतो.

यावर कंटेंट क्रिएटर जेक यांनी एक रील पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी घरात कपडे सुकवल्याने त्याचा आपल्या शरीरावर कसा विपरीत परिणाम होतो हे सांगितलेय. जेक याने सांगितले, कपडे कधीही घरात लटकवून सुकत घालू नका. कारण– त्यामुळेच घरात ओलसर वातावरण निर्माण होतं आणि बुरशी येते. विशेषतः बेसमेंट आणि तुम्ही ज्या ठिकाणी कपडे धुता किंवा वाळत घालता, त्या ठिकाणी बुरशी दिसून येते.

परंतु, याने आपल्या शरीरावर काय विपरीत परिणाम होतो आणि घरात कपडे सुकवण्याची सवय कमी करण्यासाठी काय करावे ते जाणून घेऊ

सार्वजनिक आरोग्य तज्ज्ञ डॉ. जगदीश हिरेमठ यांनी सांगितले की, ओले कपडे घरात सुकवल्याने घरातील आर्द्रतेचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढते आणि त्यामुळे बुरशी वाढण्यासाठी अनुकूल वातावरण तयार होते. कारण– ज्यावेळी कपडे हवेत सुकत असतात तेव्हा त्यातील आर्द्रतेचे आजूबाजूच्या वातावरणात बाष्पीभवन होते, ज्यामुळे हवेतील बाष्पाचे प्रमाण वाढते.

घरात याचे नेमके काय परिणाम जाणवतात?

१) आर्द्रता वाढते : कपडे सुकताना एकाच कपड्यातून जवळपास दोन लिटर पाणी हवेत सोडले जाऊ शकते. त्यामुळे घरात वाढलेली आर्द्रता बुरशीच्या बीजाणूंसाठी योग्य वातावरण तयार करते, जे ओलसर, दमट परिस्थिती वाढवतात.

२) संक्षेपण : कमी हवेशीर जागांमध्ये बाष्पीभवनामुळे तयार झालेला ओलावा भिंती, छत किंवा खिडक्यांसारख्या थंड पृष्ठभागावर स्थिरावतो, ज्यामुळे ओलसर ठिपके तयार होतात आणि त्यामुळे बुरशीचे प्रमाण वाढते.

३) घरात हळूहळू सर्वत्र बुरशीचे अस्तित्व : घरात कपडे नियमितपणे सुकत घातल्याने ही समस्या आणखी वाढते, ज्यामुळे आर्द्रतेचे प्रमाण सतत वाढते आणि घरात हळूहळू सर्वत्र बुरशीचे प्रमाण वाढत जाते.

डॉ. हिरेमठ सांगतात, बिल्डिंग अँड एन्व्हायर्न्मेंटमध्ये प्रकाशित झालेल्या संशोधनात असे दिसून आले आहे की, ज्या घरांमध्ये आर्द्रतेचे प्रमाण ६० टक्क्यांपेक्षा जास्त असते अशा घरांमध्ये बुरशी वाढण्याची शक्यता जास्त असते. पण रोज तुम्ही घरातच कपडे सुकवत असाल, तर आर्द्रतेचे प्रमाण मर्यादेपलीकडे वाढू शकते.

आरोग्याला कोणते धोके निर्माण होतात?

घरातील आर्द्रतेमुळे वाढलेल्या बुरशीच्या संपर्कात आल्याने विविध आरोग्य समस्या उद्भवू शकतात, विशेषतः ज्या व्यक्तींना आधीच श्वसनाचे आजार, ॲलर्जी किंवा ज्यांची रोगप्रतिकार शक्ती कमजोर आहे, त्यांना अधिक धोका असल्याचे डॉ. हिरेमठ यांनी सांगितले.

१) श्वसनासंबंधित समस्या

बुरशीचे बीजाणू श्वास घेताना श्वसनमार्गात प्रवेश करतात आणि त्यामुळे



श्वसनासंबंधित त्रास होऊ शकतो. खोकला, घरघर व श्वास घेण्यास त्रास होणे यांसारखी लक्षणे उद्भवू शकतात. दीर्घकाळ संपर्कात राहिल्याने दम्यासह दीर्घकालीन श्वसनरोगांचा धोका वाढतो.

२) ॲलर्जी

बुरशीच्या बीजाणूंमुळे ॲलर्जी होऊ शकते, ज्यामुळे शिंका येणे, नाक वाहणे, डोळ्यांना खाज येणे व त्वचेवर पुरळ येणे अशी लक्षणे उद्भवू शकतात. बुरशीमुळे घरात एखाद्या व्यक्तीस ॲलर्जी झाली आणि त्या व्यक्तीच्या तुम्ही दीर्घकाळ संपर्कात राहिल्यास तुम्हालाही त्याची लागण होऊ शकते.

३) इतर घातक परिणाम

काही बुरशीच्या प्रजाती, जसे की स्टॅचीबोट्रीज चार्टारम (काळी बुरशी), मायकोटॉक्सिन तयार करतात, ज्यामुळे दीर्घकालीन थकवा, डोकेदुखी व रोगप्रतिकार शक्ती कमी होणे यांसारखे गंभीर परिणाम होऊ शकतात.

४) असुरक्षित गटांवर परिणाम

लहान मुले, वृद्ध व्यक्ती आणि कमकुवत रोगप्रतिकार शक्ती असलेल्यांना बुरशीच्या संपर्कामुळे संसर्ग होण्याचा किंवा त्यांची आरोग्य बिघडण्याचा धोका असतो. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, घरातील ओलसरपणाचा बुरशीचा श्वसनसंसर्ग व दम्याच्या प्रादुर्भावात वाढ होणे याच्याशी थेट संबंध आहे.

बुरशीचा धोका न वाढता घरात कपडे सुकवण्यासाठी काय करावे?

डॉ. हिरेमठ यांनी सांगितले की, घरात ओलावा जमा होण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी आणि चांगल्या व्हेंटिलेशन राहावे यासाठी योग्य त्या उपाययोजना केल्यास तुम्ही घरात सुरक्षितपणे कपडे सुकवू शकता.

कपडे सुकत टाकता, त्या ठिकाणी आर्द्रतेचे प्रमाण ६० टक्क्यांपेक्षा कमी ठेवण्यासाठी घरात तुम्ही डिह्युमिडिफायरचा वापर करू शकता. खिडक्या उघडून, एक्झॉस्ट फॅन वापरून तुम्ही घरातील ओलावा कमी करू शकता. इतकेच नव्हे, तर कपडे सुकवण्यासाठी घरात हवेशीर जागा निवडून हवेचा प्रवाह सुधारा. हिटेड ड्राईंग रॅक, व्हेंटेड ड्रायर आणि स्मॉलर लाँड्री लोड्सच्या मदतीने तुम्ही पटकन कपडे सुकवू शकता. सिलिका जेल किंवा चारकोल डिह्युमिडिफायर यांसारख्या शोषक पदार्थांच्या मदतीनेही तुम्ही घरातील आर्द्रता कमी करू शकता. घरात बुरशी वाढण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी नियमित तपासणी करा. घरात ओलावा निर्माण होणार नाही याची काळजी घ्या.

## शिक्षण उपसंचालकांच्या सुनावणीत दोषी ठरलेल्या संस्थेवर गुन्हे दाखल करण्यासाठी आत्मदहनाचा इशारा व्यंकटेश विद्यालयाचे प्रकरण: मिलिंद कांबळे यांचे निवेदन

लातूर: बनावट कागदपत्रे तयार करून शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची मान्यता मिळवल्या प्रकरणी येथील श्री व्यंकटेश प्राथमिक विद्यालयाचे पदाधिकारी शिक्षण उपसंचालकांच्या सुनावणीत दोषी ठरले आहेत. त्यामुळे संधितांवर गुन्हे दाखल करण्याच्या मागणीसाठी मराठवाडा निराधार संघटनेचे अध्यक्ष मिलिंद कांबळे यांनी प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन देऊन आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे.

प्राथमिक शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे यांना १२ फेब्रुवारी २०२५ रोजी दिलेल्या निवेदनात कांबळे यांनी म्हंटले आहे, श्री व्यंकटेश प्राथमिक विद्यालयाचे अध्यक्ष (स्वयंघोषित ) सुरेंद्र ब्रिजमोहन अग्रवाल, सचिव प्रशांत शिवाप्पा पटणे, राम वसंतराव यादव यांनी बनावट कागदपत्रे तयार करून शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची मान्यता मिळवली आहे. त्यामुळे शासनाच्या शिक्षण विभागाची फसवणूक केल्याची तक्रार ५ डिसेंबर २०२२ रोजी जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षणधिकाऱ्यांकडे करण्यात आली होती. त्यानंतर या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी समिती नेमण्यात आली. या समितीच्या अहवालाप्रमाणे विभागीय शिक्षण उपसंचालकांच्या कार्यालयात २ जुलै २०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली. सदर सुनावणीत अग्रवाल, पटणे आणि यादव यांना दोषी ठरवून कारवाई करण्याचा निर्णय देण्यात आला आहे. हा निर्णय देऊन सहा महिन्यापेक्षा जास्त कालावधी झाला तरी दोषींवर अदयाप कोणतीही कारवाई करण्यात आली नाही.

सदर प्रकरणातील दोषींवर बनावट कागदपत्रे तयार करून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल नाही झाल्यास जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी, प्राथमिक शिक्षणाधिकारी कार्यालयाच्या परिसरात २७ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ६ यावेळेत आत्मदहन करण्याचा इशारा मिलिंद कांबळे यांनी दिला आहे. आत्मदहनास मुख्यकार्यकारी अधिकारी, प्राथमिक शिक्षणाधिकारी आणि दोन्ही कार्यालयातील प्रमुख अधिकारी जवाबदार राहतील, असेही निवेदनात म्हंटले आहे. निवेदनाच्या प्रति मुख्यमंत्री, शिक्षण मंत्री, पालकमंत्री, शिक्षण आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलीस आधिक्षक आदींनाही पाठवण्यात आल्या आहेत.

## झरीजवळ अपघातात २ ठार

परभणी : परभणी ते जिंतूर या महामार्गावरील झरी शिवारातील पेट्रोल पंपाजवळ कारने दिलेल्या जोरदार धडकेत मोटारसायकलवरील बाप–लेकीचा मृत्यु झाल्याची घटना शनिवारी सायंकाळी ५:०० च्या सुमारास घडली.




एम एच १२ एन बी ३९०३ या क्रमांकाची स्विफ्ट डिझायर कार व एम. एच. ३७ एजे १६४४ या क्रमांकाची मोटारसायकल या दोन वाहनात जोरदार धडक झाली. त्या धडकेत मोटारसायकलवरील किरण चौधरी(४०) यांचा पाय निखळला तर मोटारसायकल वरील छोटी मुलगी कृष्णाई किरण चौधरी(१३) हिच्या पायास जबरदस्त मार लागला.

दरम्यान प्रत्यक्षदर्शनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन जखमींना परभणी जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी रवाना केले. मात्र या अपघातात दोन्ही बाप–लेकीचा मृत्यु झाल्याची माहीती मिळाली आहे.

## श्री वेताळेश्वर शिक्षण संस्थेत शिवजन्मोत्सव साजरा

श्री वेताळेश्वर शिक्षण संस्थेच्या लातूर कॉलेज ऑफ फार्मसी, हासेगाव येथे दिनांक् २२ फेब्रुवारी २०२५रोजी् छत्रपती शिवाजी जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमा सूसंस्थेचे अध्यक्ष भिमाशंकरप्पा बावगे, सचिव वेताळेश्वर बावगे, संचालक नंदकिशोर बावगे, तसेच् प्रमुख अतिथी शिव व्याख्याते आदित्य पाटील, प्राचार्य डॉ. नितीन लोणीकर, संचालक श्री. आत्माराम मुलगे,्मुख्याध्यापक कालिदास गोरे् यांच्यासह महाविद्यालयातील् शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कार्यक्रमाची सुरुवात् शिवपूजन व दीपप्रज्वलन् करून करण्यात आली.्व्याख्याते आदित्य पाटील्यांनी आपल्या भाषणातून् शिवाजी महाराजांचे विचार, त्यांच्या शौर्यगाथा आणि आजच्या पिढीसाठी त्यांच्या शिकवणीचे महत्त्व् विशद केले.यावेळी् महाविद्यालयाच्या लेझीम पथकाने विशेष सादरीकरण् केले. विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत लेझीम नृत्याच्या तालावर् शिवरायांना मानवंदना दिली, ज्यामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे अनावरण करून गावातून पालखी मिरवणुकीचे आयोजन् करण्यात आले. विद्यार्थ्यांसह ग्रामस्थांनी् शिवगर्जना आणि घोषणांनी संपूर्ण वातावरण शिवमय केले. लेझीम पथकाच्या अनोख्या सादरीकरणाने मिरवणुकीला विशेष आकर्षण प्राप्त झाले.

कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन् महाविद्यालयातील सर्व शिक्षक , शिक्षकेत्तर आणि विद्यार्थी यांनी केले, कार्यक्रमची प्रस्तावना प्रा. योगेश हरंगुळे व सूत्रसंचालन कु.भक्ती परळे तर आभार सुमित टरके यांनी मांनले.

## शिवशाही ग्रुपच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सवा निमित्त दिव्यांग विद्यार्थ्यांना स्नेह भोजन शिवशाही उपेक्षितांचा आधार

लातूर : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५ व्या जयंती निमित्ताने शिवशाही ग्रुप महाराष्ट्र राज्य लातूरच्या वतीने विविध सामाजीक उपक्रम राबविण्यात आले. शनिवार रोजी सुआश्रय निवासी दिव्यांग विद्यालय,लातूर येथील दिव्यांग विद्यार्थ्यांना स्नेह भोजनाची मेजवानी देण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी वंदे मातरम् प्रतिष्ठाण चे अध्यक्ष ॲड गणेश गोजमगुंडे तर प्रमुख पाहुणे म्हणुन दिनेश गोजमगुंडे, मुख्याध्यापक येलमटे सर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांचा शाल पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवशाही ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष चैतन्य फिस्के यांनी केले. यावेळी मान्यवरांनी मनोगत व्यक्त करताना सांगीतलेकी, शिवशाही ग्रुपच्या माध्यमातून करण्यात येणाऱ्या सामाजीक कार्याचे कौतूक करुन आगामी काळात शिवशाही च्यावतीने समाजातील उपेक्षीतांना आधार देण्याचे कार्य होईल असा विश्वास व्यक्त केला.



कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवशाही ग्रुप च्या सदस्य पूनम पांचाळ तर आभार प्रदर्शन शैलेश साखरे यांनी केले. या कार्यक्रमाच्या नियोजनासाठी शिवशाही ग्रुप चे प्रमुख ऋषिकेश क्षीरसागर, संस्थापक सचिव विजय महाजन, शाम गुंजोटे, दीपक राठोड, ऋषिकेश भागवत, लिंगराज किवडे, विजय पवार, प्रशांत माळी ,सोमनाथ विभूते ,श्रेयशजी मुडलीक,मनोज साखरे, श्याम खंडागळे, अजय पिडगे, धनराज शेटे, सुदर्शन पवार, आशुतोष धामगुडे ,पांडुरंग चव्हाण, सागर केंद्रे, अखिलेश स्वामी, प्रसाद कुलकर्णी, शुभम जाधव, आकाश कोटलवार, शिवशांत माशाळकर, शेखर पिटले यांनी सहकार्य केले.

यावेळी उपस्थित गणेश माने, आकाश रायवाडीकर, आदित्य काटवटे, समाधान बावणे, देवा अडसुळे, अमित कसबे, सिद्धेश मंदाळे व जयदीप कारागीर इतर उपस्थित होते.

# पद्मभूषण स्वातंत्र्य सेनानी : . दत्तात्रय अंबादास मायाळू उर्फ राजदत्त सिने सृष्टीतील कोहिनुर

नवी मुंबई / के.एच. हनवते :– भारतीय विद्यापीट दंत महाविद्यालय व रुग्णालय मुख रोग निदान विभाग प्रमुख मा. प्राध्यापक डॉ. सुदर्शन रणपिसे खारघर नवी मुंबई व अखिल भारतीय गोवा स्वातंत्र्य संघाचे राष्ट्रीय संघटक मेहबूब मोहीमतूले यांनी स्वातंत्र्य सेनानी व सिने सृष्टीतील जेष्ठ दिग्दर्शक मा. राजदत्त साहेब यांना भारत सरकारच्या वतीने पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित केल्या बद्दल त्यांच्या अंधेरी येथील निवास स्थानी जाऊन भेट घेतली. त्यांना शुभेच्छा देऊन अभिनंदन करण्यात आले. वयाच्या ९४ व्या वर्षी उत्कृष्टपणे काम करण्याची जिद्द पाहता तरुणांना स्पुर्ती व प्रेरणा देण्यासारखे त्यांचे ध्येय आजही पाहण्यासारखे असल्याचे दिसून आले. त्यांचे गोवा स्वातंत्र्य सैनिकांसाठी योगदान अमूल्य आहे. समाजामध्ये आयुष्याची ९ दशके पूर्ण करून संपन्न भूतकाळाचा वारसा घेऊन एक समाधानाचे आणि कृतज्ञ आयुष्य जगत आहेत. आज कला क्षेत्रात



त्यांचे मोठे नाव आहे. आणि ते आदराने घेतले जाते. ते सहज गप्पा मारताना म्हणाले आम्ही कलाक्षेत्रातील माणसे रसिकांना ईश्वर मानतो, कोणताही कलावंत घडतो तो रसिकांमुळे. त्यांचे अनेक चित्रपट गाजलेले आहेत. त्यामुळे त्यांना अनेक सन्मान व पुरस्कार प्राप्त झाले आहेत. राजदत्त यांना कोकणातील रसिकाकडून कोकणला भेट देण्याचे आमंत्रण मेहबूब मोहीमतूले यांनी दिले, त्यावेळी त्यांनी ६० वर्षांपूर्वी कोकणात केलेल्या सिनेमांच्या आठवणीना उजाळा दिला व मला कोकणात यायला आवडेल असे मत व्यक्त केले. स्वातंत्र्य सेनानी राजदत्त यांना भारत सरकारच्या पद्मभूषण या पुरस्काराने सन्मानित केल्या बद्दल त्यांना शुभेच्छा देऊन भारत सरकारचे आभार व्यक्त करण्यात आले. अशा थोर स्वातंत्र्य सेनानी व दिग्दर्शक यांचे विचार व अनुभव प्रत्येक युवकास प्रेरणा देणारे आहेत.

# प्रा.शिवलिंग रोडगे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन




लातूर – उदगीर तालुक्यातील देवर्जन येथील प्रा. शिवलिंग रोडगे यांचे पुणे येथे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुः खद निधन झाले असून त्यांच्यावर रविवार दिनांक २३ फेब्रुवारी रोजी मूळ गावी देवर्जन येथे सकाळी आठ वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे.

ज्येष्ठ स्वतंत्र सैनिक गंगाराम रोडगे यांचे ते चिरंजीव होते. तसेच शिवा संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष दत्ता खंकरे यांचे ते भाऊजी होत. त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुली तीन भाऊ एक बहीण व आई असा परिवार आहे.

# अतनूर परिसरातील गव्हाण, मेवापूर, गुत्ती येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी

अतनूर / प्रतिनिधी :– संपूर्ण हिंदुस्थानासह महाराष्ट्राचे आराध्य दैवत शिवछत्रपती शिवाजी महाराज यांच्य व्या.जयंतीदिनानिमित्त अतनूर, गव्हाण, मेवापूर, चिंचोली, गुत्ती ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने तसेच येथील छत्रपती शिवाजी महाराज मुख्य चौकात सर्वपक्षीय दिन–दलित, पददलित, बहुजनांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यासह त्यांच्या तैलचित्र प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच यावेळी सर्वश्री ग्रामपंचायतीच्या वतीने सरपंच चंद्रशेखर पाटील, ग्रामसेवक एफ. एफ. शेख, कृषी सहाय्यक संदीप पाटील, रिपब्लकिन पार्टी ऑफ इंडीया आठवले गटाच्या वतीने जळकोट तालुकाअध्यक्ष विनोद कांबळे, युवासेनेच्या वतीने जिल्हा सरचिटणीस विकास सोमुसे–पाटील, शिवसेनेच्या वतीने जळकोट तालुकाअध्यक्ष मुक्तेश्वर पाटील, कैलास सोमुसे–पाटील, शिक्षकवृंद, शिक्षक विजय पाटील, भाजपाचे जळकोट तालुका उपाध्यक्ष ईश्वर कुलकर्णी, गुत्तीच्या सरपंच सौ.मीनाताई यादवराव केंद्रे, राष्ट्रवादीचे युवा नेते यादव विनायकराव केंद्रे, ग्रामसेवक विजय भोसले, चिंचोली येथे सरपंच सौ. रेखा नामदेव बिरादार, ग्रामसेवक फिरोज शेख, माजी सरपंच संतोष निवृत्ती बट्टेवाड, गुत्ती येथे सरपंच सौ.मीना केंद्रे, उपसरपंच गोविंद राठोड, युवा नेते तथा ग्रामपंचायत सदस्य यादव केंद्रे, ग्रामसेवक विजयकुमार भोसले, व्यंकटराव मुंडे, पुंडलिक सूर्यवंशी, धमाबाई पवार, सौ.ज्योती केंद्रे, सौ.अनुसया केंद्रे, सौ.चंद्रभागा सूर्यवंशी, सौ.कल्पना मोरे, सौ.उज्वला मोरे, गव्हाण



येथे सरपंच बालाजी गुडसुरे, उपसरपंच तथा सर्व ग्रामपंचायत सदस्य, मेवापूर येथे सरपंच सौ.कोमल तुळशीदास पाटील, युवा नेते तुळशीदास पाटील, युवा कार्यकर्ते अमोल गायकवाड, उपसरपंच तथा सर्व ग्रामपंचायत सदस्य व ग्रामसेवक, ग्राहक तीर्थ बिंदू माधव जोशी प्रणित ग्राहक पंचायत महाराष्ट्र राज्यातर्फे जिल्हा संघटक तथा ग्राहक संरक्षण परिषदेच्या वतीने शासननियुक्त अशासकीय सदस्य बालासाहेब गोविंदराव शिंदे अतनूरकर, मिरवणूक उदघाटक रफीयोदिन मुंजेवार, शिवसेनेचे जिल्हा सरचिटणीस विकासदादा पाटील, आदर्श शिक्षक दिलीप पाटील, साहेबराव पाटील, विजयकुमार पाटील, लातूर जिल्हा युवक कुणबी मराठा मंडळ कार्यालयात प्रदेशअध्यक्ष बी.जी. शिंदे, महिला आघाडीच्या प्रदेशअध्यक्षा सौ.संध्या शिदे, युवानेते दिलीप कोकणे, सामाजिक कार्यकर्ते संभाजी गव्हाणे–पाटील, राष्ट्रवादीचे चंद्रशेखर पाटील, जिजामाता महिला मंडळाच्या वतीने अध्यक्षा सौ.एस.बी.शिंदे, वसुंधरा महिला मंडळाच्या वतीने अध्यक्षा सौ.रूक्मिणी सोमवंशी, जनक्रांती डोंगरी विकास बहुउदेशीय सेवाभावी संस्था अतनूर च्या वतीने अध्यक्ष व्यंकटेश शिंदे, साधुराम ग्रामीण विकास बहुउदेशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने राजकुमार कापडे, चंदर पाटील, पोलिस पाटील प्रकाश पाटील, जयहिंद क्रिंडा व व्यायाम शाळेच्या वतीने आर.एल.बाबर, अँड.नवाज मुंजेवार, हिपळणारी ग्रामपंचायत च्या वतीने सरपंच श्रीमती इंद्राबाई रामचंद्र शिंदे, उपसरपंच, ग्रामसेवक व पॅनल प्रमुख चंद्रकांत रामचंद्र शिंदे, मानवी हक्क स्वंरक्षण व जागृती संघटनेचे जिल्हाअध्यक्ष चंद्रकांत शिंदे, कै.रामचंद्र शिंदे बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने सचिव सौ.श्वेता शिंदे, हणमंत साळुंके, प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉ. शकीलन शेख, वरीष्ठ अधिक्षक लिपीक पांडुरंग सुर्यवंशी, आरोग्य परिचारिका व पर्यवेक्षिका सौ.सुदर्शना चवळे– मुगदळे, आरोग्य परिचारिका व पर्यवेक्षिका सौ.चंदा सुळकेकर– कांबळे सर्व कर्मचारी यांच्यासह अनेकांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

# मंत्री पद असो नसो जनतेच्या सेवेत कमी पडणार नाही : माजी मंत्री आमदार संजय बनसोडे

उदगीर : मागील पाच वर्षांच्या काळात उदगीर मतदार संघाचा चेहरा मोहरा बदलला आहे. हजारो कोटींचा विकास निधी आणून मतदार संघाच्या वैभवात मोठी भर टाकली असून जिल्हा निर्मितीसाठी आवश्यक असलेल्या कार्यालयांची निर्मिती करून उदगीर जिल्हा निर्मितीकडे एक पाऊल टाकले आहे. उदगीर शहरातील विकासात भर टाकण्यासाठी तहसील कार्यालय, पंचायत समिती, विविध समाजाचे सभागृह, प्रशासकीय इमारत, पोलीस स्टेशन अशा विविध कार्यालयाच्या भव्य दिव्य इमारती उभारण्यासोबत, परिवहन कार्यालयाची स्थापना केली. विविध समाजघटकांना न्याय देत असताना शहरातील विविध विकास कामासाठी मोठ्या प्रमाणात राज्यशासनाकडून निधी खेचून आणत उदगीरचा कायापालट केला आणि हे कार्य असेच पुढे चालु राहणार आहे. आपल्याकडे मंत्री पद असो नसो जनतेच्या सेवेत कमी कधीही पडणार नसल्याची ग्वाही माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांनी दिली. ते उदगीर तालुक्यातील लोहारा येथे आयोजीत श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त भव्य नागरी सत्कार सोहळ्याप्रसंगी बोलत होते. यावेळी सेवानिवृत्त हवालदार अंगद मोगले, सौ.वैशाली मोगले, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष बालाजी भोसले, लोहा–याच्या सरपंच सौ.महादेवी कांबळे, उपसरपंच शंकर भातमोडे, पोलीस पाटील दिलीप पाटील, सुनिल केंद्रे, श्याम सोनटक्के,राम सोनटक्के, मोहन पाटील, विजय कांबळे, नरसिंग रेड्डी मोगले, कॅ.बालाजी बिरादार,



ओमप्रकाश गिरी महाराज, शेषेराव धनबा, संजीव आजणे, दिलीप कावळे, तातेराव बिरादार यासह सेवानिवृत्त अधिकारी उपस्थित होते. पुढे बोलताना आ.संजय बनसोडे यांनी, मागील पाच वर्षात मतदार संघाच्या विकास आराखडा तयार करुन 'जे जे नव ते माझ्या उदगीरला हव, ' म्हणून काम केले. भविष्यात आता उदगीरला एअरपोर्ट व पायलटचे प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यासाठी मी प्रयत्नशील आहे. त्यासाठी एअरपोर्ट अॅथॉरिटी ऑफ इंडियाकडुन सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. त्याचबरोबर मतदार संघातील मंजूर असलेल्या एम.आय.डी. सी मध्ये मोठे उद्योग उभारून येतील बेरोजगारीचा प्रश्न सोडवणार आहे. लोहारा येथे छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारकासाठी निधी देणार असुन आजपर्यंत ३ कोटी रुपयाचा विकासनिधी लोहारा गावासाठी दिला आहे. भविष्यात शेतक–यांना दिवसा विज देण्याचे माझे स्वप्न असुन तो ही प्रश्न लवकरात लवकर सोडवणार असल्याचे आ.संजय बनसोडे यांनी सांगितले. यावेळी लोहारा गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या लेखी आश्वासनंतर शिऊरच्या शेतकऱ्यांचे उपोषण तूर्त मागे



लातूर : निलंगा तालुक्यातील शिऊर ते नदीवाडी हा पाणंद रस्ता मातोश्री योजने अंतर्गत दोन वर्षांपासून मंजूर असूनही या रस्त्याचे काम रखडले आहे. या रस्त्याचे काम तात्काळ करण्यात यावे, यासाठी गेल्या पाच दिवसापासून शिऊरचे शेतकरी लातूर येथील जिल्हाधिकारी कार्यालसमोर आमरण उपोषणाला बसले होते. आज २२ फेब्रुवारी रोजी जिल्हा परिषद पंचायत विभागाचे उपमुख्यम कार्यकारी अधिकारी यांच्या लेखी आश्वासनानंतर संबधीत आठही शेतकऱ्यांनी आमरण उपोषण तूर्त मागे घेतले आहे. पाच दिवसापासून उपोषण सुरु असल्यामुळे उपोषणार्थी शेतकऱ्यांची प्रकृती खालावत होती. जिल्ह्याधिकारी कार्यालयाकडून संबंधित निलंगा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना लेखी आदेश देण्यात आले आहेत. तसेच आज जि. प. च्या पंचायत विभागाचे विस्तार अधिकारी पोतदार यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे लेखी पत्र उपोषण स्थळी येऊन दिले. आणि येत्या २८ फेब्रुवारी पर्यंत रस्त्याचे मातीकाम पूर्ण करण्यात येईल असे आश्वासन दिले. उपोषणार्थी शेतकऱ्यांनी देखील २८ फेब्रुवारी पर्यंत तूर्त मागे घेत असल्याचे लेखी देऊन विस्ताराधिकारी पोतदार यांच्या हस्ते उसाचा रस पिऊन उपोषणार्थी शेतकऱ्यांनी उपोषण सोडले. यावेळी अरुण अष्टुरे, भरत सूर्यवंशी, दिलीप सूर्यवंशी, आत्माराम सूर्यवंशी, संजय सूर्यवंशी, नामदेव तुगावे, श्रीमंत काथे, गणेश काथे, सुशीलाबाई अष्टुरे, रामदास सूर्यवंशी, भारतबाई काळे, बालाजी तुगावे, सुलोचना तुगावे, सरोजा अष्टुरे, शिवराज अष्टुरे आदींची उपस्थिती होती.

# सर्प मित्र दीपक गायकवाड यांना सर्पदंश अति दक्षता विभागात दाखल. प्रकृती गंभीर

नवी मुंबई / के.एच.हनवते :– (तुर्भे) वंचित बहुजन आघाडी चे बोन्सारी गाव (एमआयडीसी) येथील धडाडीचे कार्यकर्ते तसेच सर्प मित्र, समाज सेवक : दीपक गायकवाड यांना दिनांक :१८ फेब्रुवारी रोजी (डी.व्ही.जी.) कंपनीतर्फे सेवेत कार्यरत असताना नवी मुंबई एअरपोर्ट येथे साप पकडण्याकरिता पाचरण करण्यात आलेल्या कारवाईत दीपक गायकवाड यांना सर्पदंश झाला. प्राप्त माहितीनुसार त्यानंतर लगेच त्यांना (न.मु.म.पा.) सेक्टर १० वाशी रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु दोन दिवसानंतर त्यांची त्वचा काळी पडल्याने वैद्यकीय सल्ल्यानुसार बाजूच्या फोर्टीज हॉस्पीटल या खाजगी रुग्णालयात हलविण्यात आले आहे.



गायकवाड कुटुंबियांची भेट घेतली असता समाजासाठी झटणाऱ्या या तरुणाची आर्थिक परिस्थिती तशी बेताची आहे. सध्या त्यांना उपचारासाठी आर्थिक अडचण भासत आहे तरी समाजातील होतकरूनी पुढे येऊन योगदान करावे असे आवाहन गायकवाड कुटुंबीयांतर्फे करण्यात आले आहे. आर्थिक मदतीसाठी गायकवाड यांचे धाकटे बंधू नितीन गायकवाड यांच्या मो. क्र. ९५०३३ ८४६६५ यावर संपर्क साधावा.

# राहुल गदळे यांचे चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले अभिनंदन

केज/प्रतिनिधी भाजपाचे युवा नेते राहुल भैया गदळे यांचे चंद्रशेखर बावनकुळे यांनी अभिनंदन केले आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज तालुक्यातील विडा जिल्हा परिषद सर्कल मधील दहिफळ वडमाऊली येथील भारतीय जनता पार्टीचे युवा नेते राहुल भैय्या गदळे यांनी भारतीय जनता पार्टीचे संघटन परवा मध्ये तब्बल १ हजार सदस्य नोंदणी करून भाजप पक्ष वाढविण्यासाठी सहभाग घेतल्याबद्दल भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आमदार नमिताताई मुंदडा भाजपाचे ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा अक्षय भैया मुंदडा यांनी युवा नेते राहुल भैया गदळे यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत. बीड जिल्हा परिषद सर्कल मधील वडमाऊली दहिफळ येथील भारतीय जनता पार्टीचे युवा नेते राहुल भैया गदळे यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केजच्या आमदार नमिता ताई मुंदडा



यांच्या आदेशानुसार ग्रामीण भागातील गावागावा मध्ये व वाडी वस्ती तांड्यावर जाऊन भाजप सदस्य नोंदणी करून तळागाळातील नागरिकांपर्यंत भाजप पक्षाचे विचार पोहचवण्याचे काम ग्रामीण भागातून राहुल गदळे यांनी एक हजार सदस्य नोंदणी करून भाजप पक्षाचे संघटन मजबूत व बळकट केले आहे. याशिवाय महाराष्ट्राच्या विकासासाठी दूतही आपण जोडून घेतल्याबद्दल भाजपचे अध्यक्ष तथा महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य चंद्रशेखर बावनकुळे यांनी व आमदार नमिता ताई मुंदडा नंदकिशोर मुंदडा अक्षय मुंदडा यांनी युवा नेते राहुल भैया गदळे यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# संतोष देशमुख हत्या प्रकरणी संशयित पोलिस अधिकाऱ्यांना सहआरोपी करा–आ. सुरेश धस यांची मागणी

केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच स्व. संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील संशयित पोलीस अधिकाऱ्यांना सह आरोपी करण्यात यावी अशी मागणी ग्रामस्थ व देशमुख कुटुंब करीत आहे. त्या अनुषंगाने आता आमदार सुरेश धस हे देखील संशयित पोलिस अधिकाऱ्यांना आरोपी करण्यात यावे अशी मागणी करत आहेत शनिवारी आमदार सुरेश धस हे केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांची भेट घेऊन पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांच्यासोबत चर्चा करून सदल गुन्ह्यातील संशयित पोलीस अधिकाऱ्यांना या गुन्ह्यामध्ये आरोपी करण्यात यावे अशी मागणी केली आहे. राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांच्या विरुद्ध राज्यात आक्रमकपणे रान उठवून स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांना न्याय मिळवून देण्यासाठी आवाज उठून अनेक ठिकाणी मोर्चे काढले होते परंतु मंत्री धनंजय मुंडे यांची भेट घेऊन त्यांच्या तब्येतीची चौकशी केली असे माध्यमाशी बोलताना धस यांनी सांगितले होते. मंत्री धनंजय मुंडे यांच्या चौकशीची मागणी करणारे आमदार सुरेश धस यांनी त्यांची अचानक भेट घेतली. त्या नंतर राज्यात चर्चे ची राळ उडाली. त्या सर्व चर्चे च्या पार्श्वभूमीवर आमदार सुरेश धस यांनी पुन्हा पत्रकार परिषद घेवून मंत्री धनंजय मुंडे यांच्या विरुद्ध अधिक आक्रमक होत त्यांच्या कृषी मंत्री व जिल्ह्याचे तत्कालीन पालक मंत्री यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले आहेत. दिनांक २२ फेब्रुवारी २०२५ रोजी आमदार सुरेश धस यांनी संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेतल्या नंतर केज पोलीस ठाण्यात



हजर झाले. त्यांनी प्रभारी पोलीस पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांची भेट घेतली. पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांच्याशी चर्चा करून आमदार सुरेश धस यांनी अशी मागणी केली की, संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींच्या संपर्क असलेले संशयित पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील व तत्कालीन पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांना संतोष देशमुख हत्या प्रकरणी या दोन पोलीस अधिकाऱ्यांना सहआरोपी म्हणून गुन्हा दाखल करावा. अशी नागरिकांची मागणी असल्याचे त्यांनी सांगितले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE